# राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान
# आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया
# तालुका समन्वयक संस्था अंबाजोगाई जिल्हा बीड
# जनसंवाद अहवाल

## प्रा.आ. केंद्र भावठाणा  दि. ६ फेब्रुवारी २०१३

➢ **प्रश्न क्र.१ डॉक्टर स्टेथॉस्कोप (डिगरी) लावून तपासत नाही व औषधी मिळत नाही**

- प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीचे नांव, गाव व पद : ज्ञानोबा मस्के, रा. सोनवळा
- प्रश्नावर झालेली चर्चा :
  - डॉ.फड – सर्व रूग्णाला स्टेथॉस्कोप लावून तपासण्याची गरज नसते. जिल्हा पातळीवरूण मागणी प्रमाणे औषधी मिळत नसल्यामूळे काही औषधीची कमतरता आहे.
  - तालुका देखदेख नियोजन समिती सदस्य – येणाऱ्या रूग्णाला चांगली वागणूक मिळावी व डॉक्टरांनी व्यवस्थीत तपासावे हि अपेक्षा असते. व्यवस्थीत तपासले तर रूग्णाचे समाधान होते व त्याचा अर्धा आजार कमी होतो. रूग्णाचा प्रा.आ. केंद्राकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो व ओ.पी.डी.ला येणाऱ्या रूग्णाच्या संख्येत वाढ होऊ शकते.
- मुदयावर पॅनलिस्टचे मत: येणाऱ्या प्रत्येक रूग्णाला चागली वागणूक मिळालाच पाहीजे व योग्य सल्ला देऊन औषधोपचार करावा. आवश्यक औषधी रूग्ण केल्यास समितीच्या निधीमधून घेण्यात यावी.
- झालेला निर्णय: भविष्यात  प्रा.आ. केंद्राच्या डॉक्टरकडून सर्व रूग्णाला चांगली वागणूक मिळेल व कमीत कमी तीन दिवसाची औषधी देण्यात येईल
- पाठपुरावा : पूढील काळात डॉक्टरांच्या वागणूकीबद्दल काही रूग्णाला भेटून आढावा घेतला जाईल

- **प्रश्न क्र.२ प्रा.आ. येल्डा पी.एच.यू. वर इतर कर्मचारी वेळेवर येत नाही व औषधही मिळत नाही.**
    - प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीचे नांव, गाव व पद : श्री. गणेश देवकते, येल्डा.
    - प्रश्नावर झालेली चर्चा :
        - डॉ.काळेगावकर – माझी आठवडयातील तीन दिवस वाघाळा येथील आयूर्वेदिक दवाखान्यात प्रतिनियुक्ती झालेली आहे. त्यामुळे दररोज मी येल्डाला येऊ शकत नाही. मुख्य ए.एन.एम. सहा महिण्याच्या प्रशिक्षणाला गेल्यामुळे ती येत नाही. माझ्या व इतर कर्मचाऱ्यांचे कामाचे वेळा पत्रक येल्डा पी.एच.यू. वर लावले जाईल.
        - श्री. बाळासाहेब दोडतले – डॉ. काळेगावकर यांची वाघाळा येथील आयूर्वेदिक दवाखान्यात प्रतिनियुक्ती रद्द करण्याची मी जिल्हा आरोग्य अधिकारीयांना विनंती करणार आहे. कारण वाघाळा येथील रहिवास्यांना अंबाजोगाई हाकेच्या अंतरावर आहे. पण येल्डा भाग डोगराळ असल्यामुळे या दवाखान्यावर डॉक्टरची जास्त गरज आहे.
    - मुदयावर पॅनलिस्टचे मत: जिल्हा आरोग्य अधिकारीयांनी वाघाळा आयूर्वेदिक डिस्पेनसरीची प्रतिनियुक्ती रद्द करावी कारण वाघाळा हे गाव अंबाजोगाईपासून पाच ते सहा कि.मी. अंतरावर आहे. पण येल्डा भाग डोगराळ असल्यामुळे या दवाखान्यावर डॉक्टरची जास्त गरज आहे.
    - झालेला निर्णय: डॉक्टर व इतर कर्मचाऱ्याचे कामाचे वेळा पत्रक आठ ते दहा दिवसात लावले जाणार.
    - पाठपुरावा : वेळा पत्रक लावले कि नाही याची पाहणी केली जाईल.

- **प्रश्न क्र.३ ए.एन.एम., अंगणवाडी शिक्षिका आणि आशा गावामध्ये जनजागृती कार्यक्रम घेत नाही.**
    - प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीचे नांव, गाव व पद : श्रीमती. राणी यादव, भावठाणा
    - प्रश्नावर झालेली चर्चा :
        - ए.एन.एम : गावात जनजागृती कार्यक्रम घेतले जातात. दर आठवडयाला गावात गृहभेटी देऊन गरोदर व स्तनदा मातांना सल्ला दिला जातो.

  - ग्रामस्थ : फक्त रेकॉर्ड ठेवले जातात फार कमी घरांना गृह भेटी दिल्या जातात सोनवळा, राजेवाडी, धावडी येथे जनजागृतीचा एकही कार्यक्रम झालेले नाही.

- मुदयावर पॅनलिस्टचे मत: खेडया पाडयातील दलित वस्तीमध्ये आरोग्य शिक्षणाची गरज आहे. आज बऱ्याच रोगाचे कारण महिलांनमध्ये आरोग्य शिक्षणाचा अभाव आहे. ग्रामीण भागातील महिला अनाडी असल्यामुळे त्यांना समजेल अशा भाषेत आरोग्य शिक्षण आरोग्य कार्यकर्त्यांने दयावे.
- झालेला निर्णय: प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वै. अधिकाऱ्यांनी, अंगणवाडी आणि आशा सुपरावायजरयांनी काही लाभार्थीना भेटी देऊन पाहणी करावी
- पाठपुरावा : गाव आरोग्य समिती मार्फत देखरेख केली जाईल.

➢ **प्रश्न क्र.४ प्रा.आ. केंद्रातील डॉक्टर व इतर कर्मचाऱ्याचे क्वार्टर खराब आहे. भावठाणा उपकेंद्रावर ए.एन.एमला राहण्यासाठी क्वार्टर राहण्यासारखे नसतांनाही एच.आर.ए. कपात केला जातो.**

- प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीचे नांव, गाव व पद : श्री. अशोक घोडके व विलास मस्के भावठाणा
- प्रश्नावर झालेली चर्चा :
  - ग्रामीण भागात रूग्णाला चोवीस तास सेवा देण्यासाठी डॉक्टर व इतर कर्मचाऱ्याचे क्वार्टर राहण्यायोग्य पाहिजे. चोविस तास लाईट, पाणी इतर सेवा सूविधा पाहिजे. या प्रश्नावर या परिसरातील लोकप्रतिनिधीनी लक्ष दयावे विशेष करून जिल्हा परिषदचे आज उपस्थित असलेले सदस्य श्री. बालासाहेब दोडतले.
  - तालुका वै. अधिकारी : आरोग्य विभागाचे इंजिनिअरयांनी पाहणीकरून क्वार्टर दुरूस्तीचा प्रस्ताव तयार करावा.
  - समिती सदस्य : रूग्ण कल्याण समितीच्या निधीमधून काही क्वार्टर दुरूस्त करून घेता येईल का?
- मुदयावर पॅनलिस्टचे मत: जिल्हा परिषद सदस्य श्री. बालासाहेब दोडतलेयांनी या मुदयावर लक्ष दयावे व ए.एन.एमचे क्वार्टर राहण्या योग्य नसेल तर त्याची इजिनिअर कडून पाहणी करून तसा अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारीयांच्या कडे पाठवावा

- झालेला निर्णय: तालुका वै. अधिकारीयांनी बाधंकाम विभागाच्या इंजिनिअरकडून क्वार्टर दुरूस्तीचा प्रस्ताव तयार करूण घ्यावा.
- पाठपुरावा : प्राथमिक आरोग्य केंद्र देखरेख व नियोजन समिती या बाबीचा पाठपूरावा करणार.

➢ **प्रश्न क्र.५ एक वर्षा पूर्वी प्रा.आ. केंद्राला जिल्हा पातळीवरून मिळालेले निब्यूलायझर वापरात नाही. (लघवीची नळी)युरिन कॅथेटर टाकण्यासाठी रूग्णाला अंबाजोगाईला पाठविले जाते. मोतीराम काचगुंडे रा. राजेवाडी व धनराज केंद्रे रा. डोगरपिंपळा**

- प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीचे नांव, गाव व पद : श्री. मोतीराम काचगुंडे रा. राजेवाडी व धनराज केंद्रे रा. डोगरपिंपळा प्रा.आ. केंद्र देखरेख व नियोजन समिती सदस्य.
- प्रश्नावर झालेली चर्चा :
  - ग्रामीण भागातील रूग्णाला जास्तीत जास्त सेवा प्रा.आ. केंद्रावर मिळाल्या पाहीजे त्यासाठी शासनातर्फे पुरविण्यात आलेल्या साधन सामुग्रीचा पुरेपुर वापर होणे गरजेचे आहे. रूग्णाला जास्तीत जास्त सेवा मिळाल्यातर जास्त लोक सेवा घेण्यासाठी येणार. आज रूग्ण व डॉक्टर यांच्यामध्ये जो दुरावा निमार्णझाला आहे तो कमी होईल. आज ग्रामीण भागातील ८० टक्के रूग्ण सरकारी रूग्णालयात सेवा मिळत नाही म्हणून जात नाही. सेवा देण्याचे प्रमाण वाढायला पाहीजे
  - समिती सदस्य : तालुका वै. अधिकारी प्रा.आ. केंद्राच्या भेटीत या सर्व गोष्टी पाहणे गरजेचे आहे. सामान्य मानसाला या सर्वाची माहिती नसते.
- मुदयावर पॅनलिस्टचे मत: शासन ग्रामीण भागातील गरजू लोकांना सेवा पुरविण्यासाठी विविध साहित्य व साधन सामुग्री खरेदी करूण पाठवित असते. प्रा.आ. केंद्रावर शासनाकडून दिल्या जाणाऱ्या साधनाचा वापरच होत नसेल तर ही बाब फार गंभीर आहे. ग्रामीण भागातील प्रतेक रूग्ण खाजगी दवाखान्यात जावून उपचार घेऊ शकत नाही. रूग्णाला ग्रामीण रूग्णालय व प्रा.आ.केंद्रावर जास्तीत जास्त सेवा मिळाल्याच पाहिजे. नाहीतर या आरोग्य यत्रणेचा काय उपयोग.
- झालेला निर्णय: प्रा.आ. केंद्राच्या परिसरात आरोग्य शिक्षण आणि रूग्णालयात सेवा–सूविधा वाढल्याच पाहीजे.

➢ पाठपुरावा : प्राथमिक आरोग्य केंद्र देखरेख व नियोजन समिती या बाबीचा पाठपूरावा करेलं.

➢ **प्रश्न क्र.६ कर्मचाऱ्यांची रिक्त पदे**

- प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीचे नांव, गाव व पद : श्री. वैदयनाथ उगले, भावठाणा
- प्रश्नावर झालेली चर्चा : भावठाणा उपकेंद्रावर एम.पी.डब्ल्यूचे पद रिक्त आहे आणि प्रा.आ. केद्रावर प्रयोगशाळा तंत्रज्ञ नाही. जो तंत्रज्ञ आहे तो मलेरिया विभागाचा असल्यामुळे फक्त त्याला मलेरियाची तपासणी करता येते. इतर तपासण्या त्याला करता येत नाही. तसेच दोन्ही डॉक्टरचे आठवडयातील काही दिवस प्रतिनियूक्ती वाघाळा व आडस येथे झालेली आहे. जिल्हा परिषद सदस्यानी ही प्रतिनियूक्ती रद्द करण्यासाठी प्रयत्न करावे जेणे करून सेवा सुरळीत करता येईल.
- मुदयावर पॅनलिस्टचे मत: शासनाने मलेरियाच्या तंत्रज्ञाला प्रा.आ. केंद्रावर आवश्यक तपासण्याचे काही दिवसाचे प्रशिक्षण देऊन त्यांना प्रशिक्षित करावे. जिल्हा परिषद सदस्यानी डॉक्टरांची प्रतिनियूक्ती रद्द करण्यासाठी प्रयत्न करावे जेणे करून सेवा सुरळीत करता येईल.
- झालेला निर्णय: दररोज प्रा.आ. केंद्रावर ओ.पी.डीच्या वेळात डॉक्टरांनी उपस्थित राहोव. प्रतिनियूक्ती रद्द करण्यासाठी जिल्हा परिषद सदस्यानी पूढाकार घ्यावा.
- पाठपुरावा : मलेरिया विभागाच्या प्रयोगशाळा तंत्रज्ञाचे प्रशिक्षणाचा मुद्दा जिल्हा सुकाणू समितीच्या बैठकीत व जिल्हा जनसूनवाईत हा मुद्दा मांडण्यात येईल.

➢ **प्रश्न क्र.७ गावात रॅशन, रॉकेल वेळेवर मिळत नाही, अंगणवाडीतील खाऊचा दर्जा निकृष्ट असतो,**

- प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीचे नांव, गाव व पद : श्री. मारोती खरात–भावठाणा, लक्ष्मीबाई तरकसे, ज्ञानोबा मस्के –सोनवळा, सविता भाऊसाहेब होके–चिचखंडी
- प्रश्नावर झालेली चर्चा : गावातील सर्व लाभार्थ्याला दर महिण्याला रॅशन दूकानातून रॅशन वाटप होत नसल्यास सहसीलदार यांना निवेदन देण्यात यावे, जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्ययांनी या गोष्टीची पाहणी करावी. भारतातील बऱ्याच गोर–गरिब जनतेला दोन वेळा पोटभर अन्न खायला मिळत नाही. महिलांमध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी होत आहे. ग्रामीण भागात कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे शासनाची वितरण प्रणाली व्यवस्थीत चालायला पाहीजे.

- मुदयावर पॅनलिस्टचे मत: सामान्य माणसाला चांगले जिवन जगण्यासाठी, माणसाच्या काही मुलभुत गरजा पूर्ण होणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनातर्फे काही सेवा सूविधा पुरविल्या जातात त्याची अंमलबजावणी गावपातळीवर योग्य पध्दतीने होणे गरजेचे आहे. त्यासाठी शासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांची भूमिका फार मोठी आहे. जिल्हा परिषद सदस्य यांनी तहसीलदारयांची भेट घेऊन वितरण प्रणालीमध्ये काय अडचणी आहे याची पाहणी करावी या गावात रॅशन का मिळत नाही याची पाहणी करावी
- झालेला निर्णय: जिल्हा परिषद सदस्य यांनी तहसीलदारयांची भेट घेऊन वितरण प्रणालीमध्ये काय अडचणी आहे याची पाहणी करावी या गावात रॅशन का मिळत नाही याची पाहणी करावी
- पाठपुरावा – तालुका जनसुनवाई पर्यत मुद्द न सुटला तर हा मुद्दा तालुका जनसुनवाईमध्ये माडण्यात येईल.

➢ **प्रश्न क्र.८ भावठाणा पवार वस्तीच्या अंगणवाडीचे बाधंकाम केव्हा सुरू होणार.**

- प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीचे नांव, गाव व पद : श्री. अशोक घोडके रा. भावठाणा,
- प्रश्नावर झालेली चर्चा : भावठाणा येथील पवार वस्तीमधील अंगणवाडी बाधंकामासाठी १.५लाख रूपयाचा निधी दोन ते तीन वर्षापूर्वी पंचायत समितीमधून मिळाला होता, पण आज पर्यत अंगणवाडीचे बाधंकाम सुरू झालेले नाही. अंगणवाडी आज हि उघडयावर भरते.
- मुदयावर पॅनलिस्टचे मत: तालुका गटविकास अधिकारीयांनी संबंधीत व्यक्तीवर कठोर कारवाई करावी. भविष्यात दुसऱ्या गावात अशी घटणा घडणार नाही.
- झालेला निर्णय: जिल्हा परिषद सदस्य व जिल्हा समन्वयक गट विकास अधिकारी यांची भेट घेऊन परिस्थिचा आढावा घेतील.
- पाठपुरावा: तालुका पातळीवरून माहिती न मिळाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारीयांना निवेदन देणे.